Scan QR code
to visit...
Epaper Portal

दैनिक
सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code
to visit...
Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १५३ • Title - Code :- MAHMAR49513 • सोमवार दि.४ मार्च २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

वंचित–मविआची बोलणी फिस्कटली ?

‘एकला चलो रे’चा इशारा देत प्रकाश आंबेडकर यांच्याकडून लोकसभेसाठी ३ उमेदवारांच्या नावाचे संकेत!

अकोला (वृत्तसंस्था)–महाविकास आघाडी आणि वंचितमध्ये लोकसभेच्या जागावाटपाची बोलणी सुरु असल्याचा दावा मविआचे नेते एकीकडे करत आहेत. परंतु दुसरीकडे वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकर आज सकाळपासूनच आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे. त्यातच त्यांनी दुपारी पत्रकार परिषद घेत मविआत आम्ही आहोत की नाही याची आम्हाला देखील कल्पना नाही. परंतु तीन ठिकाणी आमचे उमेदवार जवळपास निश्चित झालेले आहे, असे संकेत देखील त्यांनी दिले. दुसरीकडे आमच्या मुद्द्यांनाच अटी समजण्याचे काम काही सहकाऱ्यांना वाटत आहेत, अशी खंत देखील प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केली. दरम्यान, तीन उमेदवारांच्या घोषणेचे संकेत दिल्याने, ’वंचित’ अन् ’मविआ’ यांच्यातील जागावाटपासंदर्भातील बोलणी फिसकटल्याची राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.

या तीन ठिकाणी केले उमेदवार जाहीर

प्रकाश आंबेडकर यांनी रविवारी अकोल्यात पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी लोकसभेच्या तीन जागांवरील वंचितचे उमेदवार जाहीर केले. यामध्ये अकोल्यातून स्वत: प्रकाश आंबेडकर लढतील. तर वंचितकडून वर्धा येथे प्रा. राजेंद्र साळुंखे आणि सांगलीतून चंद्रहार पाटील यांना लोकसभेची उमेदवारी देण्यात आली आहे.

वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी आज तीन उमेदवारांची थेट नावं जाहीर केली आहेत. त्यामुळे आता मविआला प्रकाश आंबेडकरांची मनधरणी करण्यात यश मिळणार आहे की नाही. जर मविआला मनधरणी करण्यात यश मिळाले नाही तर २०१९ प्रमाणे वंचित बहुजन आघाडी पुन्हा ’एकला चलो रे’च्या भूमिकेत दिसेल, अशी चर्चा पाहायला मिळत आहे.आंबेडकरांनी जाहीर केलेले नाव आता मविआचे नेते परस्पर झालेले जागावाटप मान्य करुन वंचितला आपल्यात सामावून घेणार का, हे पाहावे लागेल. दरम्यान, प्रकाश आंबेडकर यांना महाविकास आघाडीशी युती होणार का, असा प्रश्नही पत्रकार परिषदेत विचारण्यात आला. त्यावर प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले की, आम्ही देखील त्याबाबत अद्याप संभ्रमात आहोत. आम्ही मविआचा भाग आहोत किंवा नाही, हेच आम्हाला कळत नाही, असेही ते म्हणाले.आम्ही आमची ताकद असलेल्या जागांची माहिती मविआकडे दिली. मविआने १५ जागा ओबीसी आणि ३ अल्पसंख्याकांना द्यावा. माध्यमांमध्ये आमच्या मुद्द्यांना आमच्या अटी म्हणून सांगितलं गेलं, मात्र हे तसं नव्हे. मविआला आम्ही आमचं म्हणणं मांडलंय. त्यांनी निर्णय घ्यावा. कार्यकर्ते उत्साही असतात. आमच्या पक्षात भांडण वाढू नये, डोकेदुखी वाढू नये म्हणून मविआच्या बैठकीला जाऊ नका असे सांगितल्याची माहिती प्रकाश आंबेडकर यांनी दिली.६ तारखेपर्यंत सारं काही सुरळीत होईल, या वडेट्टीवारांच्या वक्तव्याबद्दल माहीत नाही. त्यांच्यातील १५ जागांवरचा तिढा सुटला तर पुढे पाहू. एकट लढलो तर आमची लढत भाजपसोबत. मविआसोबत नाही जुळलं तर सध्या काहीच सांगू शकत नाही. मी अकोल्यातूनच लढणार. मोदींनी माझ्याविरोधात अकोल्यात येऊन लढावं. पुढच्या मविआच्या बैठकीचं निमंत्रण नाही, असेही प्रकाश आंबेडकर यांनी स्पष्ट केले.



फडणवीस यांना जीवे मारण्याची धमकी देणारा ताब्यात

मुंबई–उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिवे मारण्याचे धमकी देणाऱ्या मुख्य आरोपीला अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. या आरोपीला सातारा जिल्ह्यातून अटक करण्यात आली आहे. त्याने एका व्हिडिओच्या माध्यमातून देवेंद्र फडणवीस यांच्यावर समाजात तेढ निर्माण होईल, अशा भाषेत टीका केली होती. तसेच त्यांना जीवे मारण्याची धमकी देखील दिली होती. किंचक नवले असे या अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. नवले याला ७ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. याप्रकरणी किंचक नवले याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. यामध्ये त्यांनी देवेंद्र फडणवीस यांना जीवे मारण्याची धमकी दिली होती, त्यानंतर पोलिसांनी ही कारवाई केली आहे.उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बद्दल प्रक्षोभक भाषा वापरात त्यांना जीवे मारण्याचे धमकी दिल्याचा एक व्हिडिओ गेल्या काही दिवसात समाज माध्यमातून व्हायरल झाला होता. या प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचा पदाधिकारी योगेश सावंत यानेही हा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केल्याबद्दल त्यालाही अटक करण्यात आली आहे. तेव्हापासूनच पोलिस मुख्य आरोपीच्या शोधात होते. मात्र, किंचक नवले हा वेशांतर करून वेगवेगळ्या ठिकाणी राहत होता. त्यामुळे तो पोलिसांच्या ताब्यात येत नव्हता. मात्र, अखेर सातारा स्थानिक गुन्हे शाखेच्या मदतीने सांताक्रुज पोलिसांनी त्याला शनिवारी सातारा येथील सदर बाजार येथून अटक केली.या प्रकरणी किंचक नवले याचा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केल्याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता योगेश सावंत याला आधीच अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी विधानसभेमध्ये पडसाद उमटले होते. सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या वतीने याप्रकरणी योगेश सावंत त्याला अटक करण्याची मागणी करण्यात आली होती. तसेच शरदचंद्र पवार गटाचे आमदार रोहित पवार हे आरोपीला सोडवण्यासाठी प्रयत्न करत असल्याचा आरोप देखील विधिमंडळात करण्यात आला होता. मात्र, तो माझा कार्यकर्ता असून त्याने केवळ व्हिडिओ शेअर केला होता, अशा शब्दात आमदार रोहित पवार यांनी योगेश सावंत याची बाजू घेतली होती.

कमिशन वसूल करून पोट भरणारे महायुतीचे सरकार–विजय वडेट्टीवार

मुंबई–पंतप्रधान नरेंद्र मोदींना बोलावून गाजावाजा करत उद्घाटन केलेल्या समृद्धी महामार्गाचा पूर्ण बोजवारा उडाला आहे. मागील १० वर्षात जगातील इतर देशांनी किती प्रगती केली. इकडे भाजपचं सरकार साधं रस्त्याचं काम ही चांगलं करू शकत नाही. हजारो कोटी खर्चून तयार करण्यात आलेल्या ह्या महामार्गाचे काम इतके निकृष्ट दर्जाचे आहे की आज या रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहे.निकृष्ट बांधकामामुळे अनेक अपघात समृद्धी महामार्गावर आतापर्यंत झाले आहे. अशी टीका विधान सभेतील विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. या संदर्भात वडेट्टीवार यांनी एका पोस्टच्या माध्यमातून राज्यातील महायुती सरकारवर निशाणा साधला.

या संदर्भात बोलताना विजय वडेट्टीवार म्हणाले की, समृद्धी महामार्ग विकासाच्या नावाखाली फक्त हजारो कोटींची कंत्राटे काढल्या गेली. ते देण्याच्या बदल्यात कंत्राटदारांकडून शेकडो कोटींचे कमिशन सत्ताधाऱ्यांनी आपल्या खिशात गोळा केले. इतके कमिशन वसूल करून पोट भरणार ते महायुतीचे सरकार आणि मंत्री कसले? अजूनही कमीशन ची भूक बाकीचं आहे. म्हणूनच समृद्धी महामार्गावर विकासाच्या नावाखाली आणखी २४०० कोटींचा कंत्राट या सरकारने काढले असल्याचा आरोप देखील विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.समृद्धी महामार्गांवर जीवघेणा खड्डा पडल्याची मोठी बातमी समोर आली आहे. यामुळे लोहोगाव पुलावरील खड्ड्यांमुळे कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. हजारो कोटी रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या महामार्गालाच भगदाड पडल्याने समृद्धी महामार्गांच्या कामावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. यावरुन आता विरोधकांनी सत्ताधारी भाजप आणि शिवसेनेवर टीका केली आहे. या महामार्गाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे.

राजीव गांधींप्रमाणे राहुल गांधींना बॉम्बने उडवण्याची धमकी दहशतवाद विरोधी पथककाने नाशिकमधून एकाला घेतले ताब्यात

नाशिक–काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी भारत जोडो न्याय यात्रेच्या माध्यमातून नाशिक जिल्ह्यामध्ये दाखल होणार आहेत. या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्यात त्यांच्या यात्रेची जोरदार तयारी करण्यात येत आहे. दरम्यान राजीव गांधी यांच्याप्रमाणे राहुल गांधी यांना देखील बॉम्बने उडवून देण्याची धमकी नाशिक पोलिसांना देण्यात आली होती. त्यानुसार नाशिक पोलिसांनी तात्काळ कारवाई करत गंगापूर येथून धमकी देणाऱ्या माथेफिरुला ताब्यात घेतले आहे. याबाबत दहशतवादी विरोधी पथक आणि नाशिक पोलिसांच्या सहकार्याने सुरक्षा व्यवस्थेत आणखी वाढ करण्यात आली आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते खासदार राहुल गांधी हे सध्या भारत जोडो न्याय यात्रा काढत आहे. त्यांची ही यात्रा आता महाराष्ट्रातून जाणार आहे. यात नाशिक मध्ये विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने नाशिक शहरात तसेच जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात तयारी करण्यात येत आहे. तसेच न्याय यात्रेत कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, त्यामुळे स्थानिक प्रशासन देखील सज्ज झाले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर नाशिक पोलिसांना आलेला हा धमकीचा फोन गांभीर्याने घेण्यात आला होता. सदरील व्यक्ती हा गंगापूर परिसरातील रहिवासी असून तो एक माथेफिरू असल्याचा अहवाल पोलिसांच्या वतीने देण्यात आला आहे. सदरील व्यक्तीने दारूच्या नशेत हा फोन केला असल्याचे देखील तपास यंत्रणाच्या निदर्शनास आले आहे. मात्र, असे असले तरी घटनेची गांभीर्य लक्षात घेता संबंधित व्यक्तीवर पोलिसांची करडी नजर राहणार आहे.याबाबत पोलिस निरीक्षक सुभाष पवार यांनी माध्यमांना सांगितले की, आठ ते दहा दिवसापूर्वी नियंत्रण कक्षामध्ये हा धमकीचा कॉल आला होता. यामध्ये राहुल गांधी यांच्या हत्येचा कट रचला गेला असल्याचे सांगण्यात आले होते. तसेच राजीव गांधी यांच्याप्रमाणे राहुल गांधी यांना देखील बॉम्बने उडून देऊ, अशी धमकी देण्यात आली होती. या धमकीची गंभीर दखल घेत गुन्हे शाखा आणि दहशतवाद विरोधी पथकाने पाठपुरावा करत संबंधित व्यक्तीला नाशिक येथील गंगापूर हद्दीतून ताब्यात घेतले आहे.

मविआसोबत युती पूर्ण नाही, बैठकीला उपस्थित राहू नका–प्रकाश आंबेडकर

अकोला–वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी इतर पक्षांच्या बैठकीला उपस्थित राहू नका, वंचित आघाडीची महाविकास आघाडीसोबत अद्याप युती नाही, असे वंचित आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे. वंचित बहुजन आघाडीची अद्याप महाविकास आघाडीसोबत पूर्ण युती झाली नाही, त्यामुळे इतर पक्षांच्या बैठकीला किंवा कार्यक्रमाला बोलवत असतील तरी पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी उपस्थित राहू नये, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकरांनी केले आहे.प्रकाश आंबेडकर यांनी ट्विटर म्हणजेच आताच एक्स मीडियावर व्हिडिओ पोस्ट करत याबाबत माहिती दिली आहे. या पोस्टसोबत व्हिडिओ शेअर करताना लिहिले आहे की, वंचित बहुजन आघाडीच्या सर्व कार्यकर्त्यांना आवाहन आहे की, वंचित बहुजन आघाडीची महाविकास आघाडीसोबत अजूनपर्यंत युती पूर्ण झालेली नाही. तेव्हा इतर पक्षांकडून पक्ष बैठक किंवा कार्यक्रमाला बोलावत असतील तर त्या बैठकी, कार्यक्रमामध्ये उपस्थित राहू नये. ड. प्रकाश आंबेडकर आणि पक्षाच्या प्रदेशाध्यक्षा रेखाताई ठाकूर यांची सूचना येईपर्यंत कोणीही सहभागी होऊ नये.

वडिलाने केली २ मुलीसह पत्नीची कुऱ्हाडीने हत्या

गावात भीतीचे वातावरण;मौशी येथील हृदयदावक घटना

तळोधी (बा) । प्रतिनिधी

नागभीड पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या मौशी (बाळापूर)येथील अंबादास लक्ष्मण तलमले वय ५० वर्षे याने स्वतःची पत्नी सह २ मुलीची हत्या केली असल्याचा प्रकार ३ मार्चला सकाळी ६ वाजता उघडकीस आली असून गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले.आरोपीस पोलिसांनी अटक केली आहे.

मौशी येथील अंबादास, पत्नी अल्का (वय ४० वर्ष)मुली तेजस्विनी (वय २० वर्ष), प्रणाली (वय वर्ष १७) व अनिकेत वय १५ असे चार व्यक्ती घरी राहत होते.

मोठ्या एका मुलीचे लग्न झाले होते, वडील अंबादास हा व्यसनाधीन असल्याने नेहमी पत्नीला पैसे मागायचा आणि दारू प्यायचा. घटनेच्या दिवशी यांने हत्या करून सकाळी ५ वाजता बाहेर गेला आणि ६ वाजता बाहेरून आला असता आरोपीचा मुलगा अनिकेत हा वर्ग १० वीत असल्याने अभ्यास करुण बाहेर फिरण्यास गेलेला होता, घरी आल्यावर हा प्रकार दिसला ,त्याने काका नामदेव तलमले याला झालेला प्रकार सांगितला. लगेच आरोपीने गळफास घेण्याचा प्रयत्न केला पण तो यशस्वी न झाल्याने गावकऱ्यांनी त्याला पोलिसांच्या स्वाधीन केले. पत्नी व २ मुली यात एक १२ वी ची परीक्षा देत असल्याचे कळते तर मुलगा १० वी परीक्षा देत आहे. पत्नी व मुली यांचे घटना स्थळावर पंचनामे करून शव विच्छेदन करण्यासाठी ग्रामीण रुग्णालय नागभीड येथे पाठविण्यात आले असून घटना स्थळाला पोलीस अधीक्षक , अप्पर पो अधीक्षक रीना जनबंधू, उप विभागीय पो अधिकारी दिनेश ठोसरे स, पोलीस निरीक्षक विजय राठोड यांनी भेट दिली असून आरोपीस अटक करून अपराध क्र. ७५ /२०२४ अन्वये गुन्हा दाखल करून कलम ३०२ भा, द वी अटक करून पुढील तपास ठाणेदार विजय राठोड करीत आहे.

‘समृद्धी’ला शिंदे–फडणवीसांच्या भ्रष्टाचाराचे भगदाड

आभाळच फाटले, कुठे कुठे ठिगळं लावणार?–नाना पटोले

मुंबई–मुंबई ते नागपूर ७०० किलोमिटरच्या समृद्धी महामार्गाचा शिंदे–फडणवीस सरकारने मोठा गाजावाजा केला, जाहिरातबाजी करुन पंतप्रधान मोदींच्या हस्ते उद्घाटनही केले. १२ तासात मुंबईहून नागपूरला पोहचणार असा दावा करणाऱ्या महामार्गाचेच १२ वाजले आहेत. समृद्धी महामार्ग पहिल्यापासूनच वादग्रस्त ठरला आहे. सातत्याने होत असलेल्या अपघाताचा प्रश्न असताना आता या महामार्गावरील एका पुलाला मोठा खड्डा पडला आहे. पुलावरील खड्ड्यांमुळे समृद्धी महामार्गाच्या कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह तर निर्माण झाले आहे. पुलावर पडलेला हा केवळ खड्डा नसून ‘समृद्धी’ला शिंदे–फडणवीसांच्या भ्रष्टाचाराचे पडलेले हे भगदाड आहे, असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.

यासंदर्भात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील लोहोगावजवळच्या पुलाला खड्डा पडल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. अवघ्या १४ महिन्यातच पुलावर भला मोठा खड्डा पडल्याने या रस्त्याच्या बांधकामाचा दर्जा चांगला नसल्याचे स्पष्ट दिसत आहे. समृद्धी महामार्गाच्या आराखड्यात व बांधकामात त्रुटी असल्याच्या तक्रारी करण्यात येत होत्या, परंतु त्याकडे दुर्लक्ष केले गेले. नागपूर–मुंबई समृद्धी हा ५५ हजार कोटी रुपयांचा महामार्ग सुरुवातीपासूनच भ्रष्टाचाराचे कुरण ठरला आहे. महामार्गासाठी जमीन संपादन करताना मोठा भ्रष्टाचार झाला तसेच या महामार्गाच्या तांत्रिक बाबीमध्येही गडबड आहे.समृद्धी महामार्गाच्या आराखड्यासाठी तज्ञांच्या विशेष पथकाला हजारो कोटी रुपये दिले पण अपघाताचे प्रमाण पाहता रस्ते बांधणी करताना फारशी काळजी घेतल्याचे दिसत नाही. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने आणि एक्स्प्रेस वे साठी साठी निश्चित केलेले नियम पाळलेले नाहीत. रोड हिप्नॉसीसमुळे अपघात होतात असे काही काही तज्ञांनी सांगितले आहे त्यावर काही उपाय केलेले नाहीत. रस्त्यावर ठरावीक अंतरावर चहापाणी, हॉटेल आणि स्वच्छतागृहे उपलब्ध नाहीत. त्यात आता रस्त्याला भगदाड पडल्याने या महार्गाने कोणाची समृद्धी केली हे दिसत आहे, असा टोलाही नाना पटोले यांनी लगावला.

क्लिक नांदेडच्या छायाचित्रांचे प्रदर्शन पाहताना रसिक हरवून गेले

नांदेड । प्रतिनिधी

अनेकदा छायाचित्रकार निर्जीव वस्तूंना आपल्या कलात्मक व सृजनशील कॅमेऱ्यातून टिपत असतो. त्यामधूनच ही चित्रे अजरामर होत असतात. असाच काहीसा प्रत्यय नांदेड मधील हौशी छायाचित्रकारांच्या स्पर्धेमधील काही निवडक छायाचित्रांची प्रदर्शनी पाहत असताना अनुभवायला मिळाला. या प्रदर्शनीमुळे छायाचित्र कसे अभ्यासायचे याची अनुभूती नांदेडकरांना आली.

नांदेड जिल्हाधिकारी कार्यालय आयोजित नांदेड महासंस्कृती महोत्सवानिमित्त क्लिक नांदेड हे छायाचित्र प्रदर्शन झाले.नांदेड येथील नंदिग्राम किल्ल्यावर दि १७ ते १९ दरम्यान व आयटीआय येथे छायाचित्र प्रदर्शन भरविण्यात आले होते . जिल्ह्यातील दोनशे पन्नास छायाचित्रकारांच्या बाराशे छायाचित्रांतून शंभर छायाचित्रांची निवड करण्यात आली. यातील अकरा उत्कृष्ट छायाचित्रांत देगलूरचे हौशी व व्यावसायिक छायाचित्रकार किरण मुधोळकर यांच्या छायाचित्रास प्रथम क्रमांक मिळाला. तसेच द्वितीय क्रमांक नांदेड येथील सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ, निसर्ग व पर्यटनप्रेमी, अतिशय कल्पकतेने छायाचित्रणाचा छंद हाताळणारे डॉ. अरुणजी मान्नीकर यांच्या फोटोचा आला. मावळतीच्या सूर्यासमोर काळवीट उभे असल्याचे अप्रतिम छायाचित्र त्यांनी टिपले होते.तिसरा क्रमांक डॉ .अनिल साखरे(स्त्रीरोगतज्ञ व हौशी कलाकार) यांच्या जगविख्यात असणाऱ्या होट्टल येथील प्राचीन मंदिराचा आला आहे. तसेच नांदेड येथील डॉ. श्रीधर आलूरकरांच्या फोटोला विशेष पुरस्कार देण्यात आला. नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल व निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांच्या हस्ते किरण मुधोळकर यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले. या महोत्सवात क्लिक नांदेड या उपक्रमांतर्गत सुंदर फोटोग्राफीची स्पर्धा आयोजित केली होती. निसर्ग, प्राचीन मंदिरे ,प्राणीपक्षी, गुरुद्वारा मधील लंगर ,वासुदेव इ. चे फोटो या प्रदर्शनाऊ लावण्यात आले होते. सर्वच हौशी छायाचित्रकारांचे फोटो अतिशय अप्रतिम असे होते. यामध्ये राघवेंद्र कट्टी, बुद्धेवाड , डॉ. सुशील राठी व इतर मान्यवर कलाकारांचा उल्लेख आवर्जून करावा लागेल. सर्व फोटोंचे सुबक प्रिंट व लॅमिनेशन श्री ग्राफिक्सचे कुलकर्णी यांनी कलात्मक पद्धतीने व कल्पकतेने केले होते.उपक्रम यशस्वी करण्यामध्ये नायब तहसीलदार मकरंद दिवाकर व संयोजन समिती मधील सर्व मान्यवरांचा सहभाग होता. प्रदर्शन पाहण्यासाठी नांदेड शहरातील व जिल्ह्यातील हौशी छायाचित्रकारांनी व नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

पोलिस भरतीत एका जागेसाठी दहा उमेदवार

सोलापूर : शहर-जिल्ह्यातील पोलिस दलात १४२ पदांची भरती होणार असून त्यात २५ चालक व ११७ पोलिस शिपायांची पदे आहेत. मंगळवारपासून (ता. ५) अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु होणार असून ३१ मार्च ही शेवटची मुदत आहे. दरम्यान, शारीरिक चाचणीत ५० गुणांपैकी ५० टक्के गुण मिळालेल्यांमधून एका पदासाठी दहा उमेदवार, या प्रमाणात लेखी परीक्षेसाठी निवड होणार आहे.शारीरिक चाचणी उन्हाळा संपल्यानंतर होणार असून ही चाचणी ५० गुणांची असून किमान ५० टक्के गुण आवश्यक आहेत. त्याशिवाय लेखी परीक्षेला संधी मिळणारच नाही. तसेच लेखी परीक्षेत किमान ४० टक्के (१०० पैकी ४० गुण) गुण आवश्यक आहेत. चालक पदाच्या उमेदवारांना शारीरिक व लेखी परीक्षेनंतर वाहन चालविण्याचीही चाचणी द्यावी लागणार आहे. दरम्यान, उमेदवारांनी खोटी कागदपत्रे किंवा माहिती भरल्यास पडताळणी दरम्यान ही बाब निदर्शनास आल्यास तो उमेदवार भरतीतून बाद होईल आणि त्याच्याविरूद्ध कारवाई देखील होवू शकते. मागील भरतीवेळी एका उमेदवाराने केसाचा बनावट टोप बसविला होता. तर भरतीनंतर काही उमेदवारांनी आरक्षणासंदर्भातील कागदपत्रे बनावट जोडल्याचीही बाब समोर आली होती. त्यामुळे आता या भरतीत वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांचा कटाक्ष असणार आहे.

संगमनेर तालुक्यात शिकारीच्या नादात बिबट्या पाण्यात बुडाला

संगमनेर । प्रतिनिधी

संगमनेर तालुक्यात शिकारीच्या नादात बिबट्या पाण्यात बुडाला भक्षाचा पाठलाग करत असतांना भक्षाने हुलकावणी दिल्याने प्रतापपूर (ता. संगमनेर) येथील गावठाण हद्दीतील विहीरीत बिबट्या पडला होता. अथक प्रयत्न करुणही बाहेर येता न आल्याने हा बिबट्या पाण्यात बुडाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. तालुक्यातील प्रतापपूर गावातील गावठाण हद्दीतील मारुती आणि विठ्ठल मंदिरा जवळ भारत सयाजी इलग यांची गट नबंर ८ मध्ये विहीर आहे. मंगळवारी रात्री भक्षाचा पाठलाग करत असतांना भक्षाने हुलकावनी दिल्यामुळे एक बिबट्या विहिरीत पडला होता. बुधवारी दुपारी साडेचार वाजेच्या सुमारास शेजारी वस्तीवर राहत असलेल्या महीलांना बिबट्याचा गुर - गुरण्याचा आवाज आला. त्यामुळे त्यांनी विहीरीत डोकवुन पाहिले आसता विहीरीत उतरण्यासाठी लावण्यात आलेल्या कड्यांचा आधार घेऊन एक बिबट्या आपला जीव वाचवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. ही बातमी वाऱ्यासारखी पसरल्याने घटनास्थळी दाखल झालेल्या गावातील तरुणांनी प्लॅस्टिकचे कॅरेट दोरीच्या साह्याने विहीरीत सोडत बिबट्याला आधार देण्याचा प्रयत्न केला. मात्र बिबट्याच्या शरीरात प्राण शिल्लक न राहिल्याने अखेर तो पाण्यात बुडाल्याची माहिती स्थानिक नागरिकांकडून मिळाली आहे.

आपली मुले रिल्स स्टार करायची की रियल स्टार हे पालकांनी ठरवावे–प्रा.यशवंत गोसावी

जिंतूर । प्रतिनिधी

प्रत्येक पालकांच्या हातात मोबाईल,हॉल मध्ये टीव्हीवर असल्यामुळे मुलां मुलीं नाही रिल्स पाहण्याचा मोह आवरत नाही त्यामुळे आपले मुले रिल्स स्टार करायची की रियल स्टार हे पालकांनी ठरवावे असे प्रतिपादन सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने दिनांक २९ फेब्रुवारी रोजी आयोजीत करण्यात आलेल्या व्याख्यानाच्या कार्यक्रमा प्रसंगी प्रा यशवंत गोसावी यांनी सांगितले

जिंतूर शहरातील सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी यात शिवजन्मोत्सव सोहळ्याच्या समारोप प्रसंगी जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून तहसीलदार राजेश सरोदे हे होते तर उद्घाटक म्हणून पोलीस निरीक्षक बुद्धिराज सुकाळे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ गणपत वाघमारे,डॉ दुर्गादास कान्हडकर,सत्यनारायण शर्मा,रमेश दरगड,विजय चोरडिया,शेख शकील,मंचक देशमुख,डॉ योगेश तुरे,हे उपस्थित होते यावेळी पुढे बोलताना गोसावी यांनी सांगितले की,छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात महिला मुलींचा आदर केला जात असे शिवाय शेतकऱ्यांसाठी त्याकाळी लोककल्याणकारी निर्णय घेतले होते परंतु सध्या राजकीय लोकांच्या उदासीन धोरणामुळे शेतकऱ्यांना आत्महत्या करण्याची वेळ आली आहे म्हणून पालकांनी आपल्या पाल्याला उच्च शिक्षणासाठी व समाजात वावरताना छत्रपती महाराजांचा आदर्श डोळ्या समोर ठेवला पाहिजे असे प्रतिपादन केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष काकडे यांनी केले यावेळी सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त काढण्यात आलेल्या मिरवणूक शालेय विद्यार्थ्यांसाठी लेझीम चषकाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी प्राथमिक व माध्यमिक गट करण्यात आले होते यामध्ये माध्यमिक गटातून जवाहर विद्यालयास प्रथम एकलव्य बाल विद्या मंदिर द्वितीय तर कस्तुरबा गांधी विद्यालयास तृतीय पारितोषिक मिळाले तर प्राथमिक गटातील किशनराव चव्हाण विद्यालय प्रथम ऑर्किड इंग्लिश स्कूल द्वितीय तर सुभाषचंद्र राठी बालक मंदिर शाळेला तृतीय पारितोषिक देण्यात आले पारितोषिकात प्रथम रोख ४३९४ सन्मानचिन्ह व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र तर द्वितीय ३३९४ रुपये रोख सन्मानचिन्ह प्रमाणपत्र तर तृतीय २३९४ रुपये रोख सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

सोलापूर जिल्ह्यात पुन्हा वाढतेय हातभट्टीची नशा

सोलापूर : राज्य उत्पादन शुल्क विभागाने १ एप्रिल २०२३ ते २९ फेब्रुवारी २०२४ या काळात जिल्ह्यातून तब्बल ६० हजार लिटर हातभट्टी आणि १२ लाख लिटर गुळमिश्रित रसायन नष्ट केले आहे. ग्रामीण पोलिसांनीही अंदाजे तेवढाचा मुद्देमाल जप्त केला. पण, राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून ‘हातभट्टीमुक्त जिल्हा’ आणि ग्रामीण पोलिसांकडून ‘ऑपरेशन परिवर्तन’ राबविले जात असतानाही जिल्ह्यात हातभट्टीची नशा वाढलेलीच आहे, हे या आकडेवारीतून स्पष्ट होते.जिल्ह्यातील ५४ गावांमध्ये विशेषत: तांड्यांवर अवैधरीत्या हातभट्टी दारू तयार होते. दक्षिण सोलापुरातील सर्वाधिक ११, उत्तर सोलापूर व माळशिरस तालुक्यात प्रत्येकी नऊ, अक्कलकोट तालुक्यात सहा आणि करमाळा तालुक्यात सात ठिकाणी वारंवार हातभट्टी तयार होते, असे निरीक्षण राज्य उत्पादन शुल्क विभागाने नोंदविले आहे. ग्रामीण पोलिसांनी पहिल्यांदा जिल्ह्यात ऑपरेशन परिवर्तन राबवून गावागावातील तरुणांना व्यसनाच्या आहारी जाण्यापासून रोखण्याचा प्रयत्न केला. पण, आता तेवढा प्रयत्न, कारवाईतील सातत्य दिसत नाही. राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून कारवाई होते, पण त्यांची एवढी भीती अवैध व्यावसायिकांना नाही. त्यामुळे दोन्ही विभागांनी समन्वयातून आठवड्यातून किमान तीनवेळा धाडी टाकल्यास निश्चितपणे ‘ऑपरेशन परिवर्तन’ यशस्वी होईल.

माजलगावात शेतकरी कामगार पक्षाचा विराट बैलगाडी मोर्चा

तर सरकार विरोधात आसूड उगारू भाई अॅड नारायण गोले पाटील

माजलगाव । प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षापासून शासनाने शेतकरी कर्जमाफीच्या नावाखाली झुलवत ठेवला असून २०२३ चा पिक विमा कृषीमंत्र्यांनी वारंवार घोषणाबाजी करून देखिल शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केलेला नाही, गेल्या दहा वर्षांपूर्वी कापसाला असणारा भाव आजही तोच असुन तो वाढवला जात नाही, सोयाबीनचा भाव प्रत्येक वर्षी कमी होत आहे आणि वयोवृद्ध शेतकऱ्यांना शासन दुर्लक्षित करून त्यांना पेन्शन द्यायला तयार नाही,बिड जिल्हा दुष्काळाच्या झळा सहन करत असताना जिल्ह्यात दुष्काळी उपाय योजना अद्याप सुरू झालेल्या नसून गुरांच्या चारा पाण्याचा प्रश्न ऐरणीवर आलेला असताना आमदारासह मंत्री आपल्याच मोठेपणात व्यस्त आहेत, शासनाने १३८००० रुपयात गरिबांना घरकुल देण्याची बोगस योजना आणली असून गरीब घरकुल धारकांना सात हजार रुपये ब्रास ने चोरटी वाळू खरेदी करावे लागत आहे तर लोकनेते साखर कारखान्याने गतवर्षी जाहीर केलेला भाव अद्याप शेतकऱ्याला दिलेला नसून १४९रुपये प्रति टन शेतकऱ्यांची थकीत बिले त्वरित वाटप करणे आवश्यक आहे, तसेच चालू हंगामात हरभरा पिकावर धुक्यामुळे पडलेल्या रोगराईने हरभरा पिक पूर्णतः उध्वस्त झाले असून शेतकऱ्यांना हरभरा पिकाच्या नुकसानी पोटी हेक्टरी २५ हजार रुपये नुकसान भरपाई देणे गरजेचे आहे, माजलगाव तालुक्यातील सर्वात शासकीय कार्यालयात प्रचंड भ्रष्टाचार माजलेला असून भ्रष्टाचारामुळे अनेक कामे खोळंबून पडलेले आहेत याशिवाय महागाई चा आगडोंब दिवसेंदिवस वाढत असून कष्टकऱ्यांना, कामगारांना, शेतकऱ्यांना जीवन जगणे कठीण झाले आहे अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या पशुधनासह सोलार व इतर चोऱ्या प्रचंड प्रमाणात वाढलेले असून त्याबाबत पोलीस यंत्रणा कुठलाही सखोल तपास करत म्हणून शेतकरी कामगार कष्टकरी यांच्या प्रश्नांना वाचा फोडणे गरजेचे असल्याने शेतकरी कामगार पक्षाने शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासाठी उपविभागीय अधिकारी कार्यालय माजलगाव येथे दि.१ मार्च २०२४रोजी सकाळी ०२ वाजता विराट बैलगाडी मोर्चा काढण्यात आला या मोर्चाचे नेतृत्व भाई मोहन गुंड,भाई ड.नारायण गोले पाटील यांनी केले या मोर्चात दिल्लीतील शेतकरी

आंदोलनाच्या मागण्या मान्य करा, शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करा. सन२०२३चा पिक विमा त्वरित वाटप करा,शेतकऱ्यांच्या शेतमालाला किफायतशीर हमीभाव द्या., शेतकऱ्यांच्या गुरांना दावणीला चारा-पाणी द्या,लोकनेते कारखान्या कडील गतवर्षीच्या प्रति टन १४९ रुपयाच्या थकित रकमेचे बिल त्वरीत वाटप करा, वयोवृद्ध शेतकऱ्यांना प्रतिमहा १०,०००/ रुपये पेन्शन द्या.धुक्यामुळे हरभरा पिकाच्या झालेल्या नुकसानीची हेक्टरी २५०००/नुकसान भरपाई द्या.. माजलगाव तालुक्यात पशुधन, सोलार सह शेतकऱ्यांच्या झालेल्या विविध चोर्यांचा सखोल तपास करून गुन्हेगारांवर कठोर कारवाई करा. शासकीय कार्यालयातील भ्रष्टाचार थांबवून खोळंबून पडलेली कामे त्वरित करा..

गाव-वस्ती तेथे पाणी टँकर सुरू करा..

गरिबांना घरकुलासाठी मोफत वाळू द्या.. आदी मागण्यांची प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली यावेळी माजलगाव शहरात वाहतूक विस्कळीत झाली होती यावेळी पोलीस प्रशासनाने चोक बंदोबस्त ठेवण्यात आला, उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आंदोलकांनी बैलगाड्यासह ठिय्या मांडत प्रचंड घोषणाबाजी करत केंद्र व राज्य शासनाचा निषेध केला तर शेतकऱ्यांच्या मागण्याकडे दुर्लक्ष केल्यास सरकारवर आसूड उगारला जाईल असा इशारा भाई ड.नारायण गोले पाटील यांनी दिला, यावेळी भाई मुंजा पांचाळ, भाई विष्णू शेळके, भाई राहुल सोळंके,गणेश भालेकर, बबनराव चोरमले,श्रीराम कोरडे,भाई राजाभाऊ घोडके,संभाजी चव्हाण, अशोक कुलकर्णी,सतिष शेजुळ, राधाकृष्ण पांचाळ,भगवान खांबे, चंदुकाका बालवत,राजेश्वर मोरे, कोरडे,अमोल गोले, साळुजी हांडे, चांगदेव शेजुळ, सुदाम चव्हाण, मधुकर माने लक्ष्मण बादाडे, व्यंकटी खुळे, माऊली चंदनशिव, श्रीराम शेवाळे, जनार्दन कुदळे, प्रकाश थोरात, रामेश्वर मोरे, सुशील हांडे, गणेश सोनटक्के आदींनी परिश्रम घेतले.. यावेळी शेकडो शेतकरी बांधव बैलगाड्यासह आंदोलनामध्ये सहभागी झाले होते.

घोडाझरी येथे मत्स्यव्यवसायक एक दिवसीय प्रशिक्षण संपन्न

चिमूर । प्रतिनिधी

पर्यटन स्थळ घोडाझरी येथे घोडाझरी आधुनिक मत्स्यव्यवसाय संस्था नगभिड द्वारा आयोजीत आधुनिक मत्स्यव्यवसाय एक दिवसीय प्रशिक्षण व मच्छीमार संस्थेचे सत्कार तथा समाज गौरव पुरस्कार या कार्यक्रमाचे उद्घाटन राष्ट्रीय उपाध्यक्ष ओबीसी महासंघ महाराष्ट्र प्रदेश तथा समन्व्यक चिमूर विधानसभा डॉ. सतिश वारजुकर यांच्या हस्ते संपन्न झाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संचालक, राष्ट्रीय मत्स्यजीवी सहकारी संघ (फिशकॉपड) तथा (माजी) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य मच्छीमार सहकारी संघ डॉ. प्रकाश लोणारे, कार्यक्रमाचे मार्गदर्शक म्हणून सदस्य भुजलायशीन मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था व संघ नोंदणी समिती (महा. राज्य) डॉ. दिलीप शिवरकर, संयोजक ग्रामविश्व संघर्ष वाहिनी, कांग्रेस नेते विनोद बोरकर, संचालक जिल्हा मच्छीमार संघ चंद्रपूर, विजय नान्हे, प्रा. शरद गिरडे ,केवळ , देविदास मेश्राम माजी गटशिक्षणाधिकारी, सदाशिव मेश्राम प्राचार्य ग्रामदर्शन कनिष्ठ महाविद्यालय खडसंगी, विलास मोहिणकर वाल्मिकी मच्छीमार संस्था उपाध्यक्ष चिमूर, मनिष नाईक ट्री फाउंडेशन , ज्ञानेश्वर शिरभैये, अलोक कांबळे अक्काकल्चर कन्सल्टंट,उपस्थित होते.

या निमित्त उपस्थित समाज बांधवाना डॉ. सतिश वारजुकर यांनी आपल्या मार्गदर्शन व्यक्त करतांना मासेमारी पूर्वी मिशींपुरती मर्यादित होती. परंतु आजच्या काळात मत्स्यपालन व्यवसाय हा एक यशस्वी, प्रतिष्ठित आणि लघु उद्योग म्हणून प्रस्थापित होत आहे. माशांमध्ये प्रथिनांचे प्रमाण जास्त असल्याने केवळ भारतातच नव्हे तर जगभरात त्याची मागणी खूप जास्त आहे.एक काळ असा होता की नद्या आणि तलावात मासे मिळायचे. पण आजच्या काळात माशांसाठी शास्त्रोक्त पद्धतीने कृत्रिम जलाशय बनवले जात आहेत. ज्या ठिकाणी नदी आणि तलावात कोणते मासे येतात त्या सर्व सुविधा दिल्या जात आहेत. मासळीची वाढती मागणी पाहता सध्याच्या काळात मत्स्यपालन व्यवसाय सुरू करून खूप चांगला नफा मिळवता येतो.तुम्हालाही तुमचा स्वतःचा व्यवसाय सुरु करून नफा मिळवायचा आहे तर तुम्ही मत्स्यपालन व्यवसायाकडे पाहू शकता. मत्स्यपालन म्हणजेच मासेमारी व्यवसाय तुमच्यासाठी खूप फायदेशीर व्यवसाय बनू शकतो. असे सांगितले. या कार्यक्रमाचे आयोजन मुख्य व्यवस्थापक घोडाझरी आधुनिक मस्त्य व्यवसाय संस्था नागभीड विजय डाबरे यांनी केले तर सूत्र संचालन कांग्रेस नेते विवेक कापसे यांनी केले ढिवर समाजा तर्फे डॉ. सतिश वारजूकर यांचे शाल व सिल्ड देऊन सत्कार करण्यात आला.

पल्स पोलिओ लसीकरण कार्यक्रम

चिमूर । प्रतिनिधी

चिमूर तालुक्यातील शंकरपूर येथे ३ मार्च रोज रविवारला प्राथमिक आरोग्य केंद्र येथे पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाला शंकरपूर ग्रामपंचायतीचे सरपंच साईस वारजूकर व उपसरपंच अशोक चौधरी यांच्या हस्ते लहान मुलांना पोलिओचे दोन थेंब देऊन शुभारंभ करण्यात आला.

यावेळी शंकरपूर प्राथमिक केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर सुबोध वाकडे, आरोग्य सहाय्यक दिलीप गायधने, श्याम गायकवाड, सी एच ओ डॉक्टर माधुरी राठोड, श्रद्धा मंडपे, कपिल खडतकर, आरोग्य सेविका स्मिता आबूजवार, आरोग्य सेवक जयंत मोडक विठ्ठल जाधव, ओमप्रकाश चौधरी, डाटा एन्ट्री ऑपरेटर पिसे,वाहन चालक चुडामन खोब्रागडे आणि पठाण उपस्थित होते. तसेच शंकरपूर येथील आठ अंगणवाडी केंद्रातील लहान मुलांना सहा बूथ केंद्रावर पर्यवेक्षिका अंगणवाडी सेविका मदतनीस यांच्या हस्ते पल्स पोलिओ अभियान मोहीम राबविल्या गेले.

जागतिक पोलिओ निर्मूलनात भारत अव्वल-किरण बोढे

घुग्घुस प्रतिनिधी

घुग्घुस येथे पोलिओ लसीकरण मोहीम रविवार, ३ मार्च रोजी सकाळी ८ वाजता पासून राबविण्यात आली.पोलिओ लसीकरण अंतर्गत दोन थेंब प्रत्येक वेळी, पोलिओवर विजय दरवेळी हे ब्रीदवाक्य घेऊन ५ वर्षा खालील प्रत्येक बालकाला पोलिओचा डोस देण्यासाठी ही मोहीम शहरात राबविण्यात आली. अंगणवाडी केंद्र क्रमांक २ येथे प्रयास सखी मंच अध्यक्षा किरण बोढे यांनी भेट दिली व बालकांना पोलिओ डोस पाजला.यावेळी प्रयास सखी मंच अध्यक्षा किरण बोढे, माजी जि.प. सभापती नितु चौधरी, माजी ग्रामपंचायत सदस्या वैशाली ढवस, आरोग्य सेविका किरण जुनघरे, सविता शेंडे, आरोग्य सेवक एस. डी. पावडे, नैना चिकाटे, प्रेमिका कांबळे आदी उपस्थित होते.

मारोडा येथील असंख्य कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

मूल । प्रतिनिधी

तालुक्यातील मारोडा येथील युवा कार्यकर्ते शुभम आकुलवार,रीतिक मेश्राम यांचे समवेत असंख्य युवकांनी शनिवार दि.२ मार्च.रोजी शिवसेना (उ.बा.ठा) प्रवेश केला.

सदर पक्षप्रवेश शिवसेना जिल्हा प्रमुख संदीप गिऱ्हे यांचे उपस्थितीत मारोडा येथे पार पडला.शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारावर प्रेरित होउन तसेच पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या कार्यावर विश्वास ठेवून शिवसेना जिल्हाप्रमुख संदीप गिऱ्हे यांच्या उपस्थितित शिवसेना तालुका प्रमुख प्रशांत गट्टूवार यांच्या नेतृत्वात मारोडा येथील असंख्य युवकांनी पक्ष प्रवेश केला.यावेळी शिवसेना जिल्हा प्रमुख संदीप गिऱ्हे यांनी उपस्थित मारोडा चे तडफदार युवा कार्यकर्ते शुभम आकुलवार तथा रीतिक मेश्राम आणि असंख्य युवकांच्या गळ्यात मशाल चिन्हाच दुपट्टा टाकत स्वागत केल. यावेळी युवकांना मार्गदर्शन करताना जिल्हा प्रमुख संदीप गिऱ्हे गावातील असंख्य समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले.त्यात प्रामुख्यांनी घरकुल धारकाना रेती उपलब्ध व्हावी करिता लवकरच जिल्हाधिकारी याना निवेदन देऊन घरकूल धारकाना रेती उपलब्ध व्हावी करिता प्रयत्न करणार असे सांगीतले.मुल शहरात उद्धव बाळासाहेब ठाकरे सेवा केंद्र जनसंपर्क कार्यालय दि.५ मार्च २०२४ ला साय.६.०० उदघाटन करुन तालुक्यातील गोरगरिबांचे प्रश्न या कार्यालयातून सोडविण्यात येथील असे आपल्या मार्गदर्शनातून सांगितले.यावेळी युवासेना तालुका प्रमुख रीतीक संगमवार,महेश चौधरी सुनील काळे,आकाश राम,छोटू आगबत्तुनवार,चेतन मुंगमोडे आदि पदाधिकारी उपस्थित होते.रितिक मेश्राम,शुभम आकुलवार,संकल्प राशेट्टीवार,हेरम आदे,कपिल शंकदरवार,दिग्गु नेरलवर,रोहित भुपतवार,निरंजन मानकर,श्रीरंग गुरणुले,शशिकांत हणवते,स्वप्नील मानकर, सुमित मानकर, अजय वाढई,प्रतीक मांदाळे,गौरव गुरणुले,अतुल वाढई, प्रथम सोनुले,विजय खोब्रागडे,धनंजय मुपीडवार,ओम जिदगिल्लवार,हेमांस रोटावार आदी कार्यकर्त्यांनी आयोजित कार्यक्रमात प्रवेश केले.तथा गावकऱ्यांची विशेष उपस्थिती होती.

आनंद निकेतन कृषी महाविदयालय मध्ये माती व पाणी परिक्षण प्रशिक्षणाचे आयोजन

आनंदवन । प्रतिनिधी

महारोगी सेवा समिती व्दारा संचालित तथा डॉक्टर पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला संलग्नित आनंद निकेतन कृषी महाविद्यालय, आनंदवन, वरोरा येथे २७ फेब्रुवारी ते ३ मार्च या दरम्यान माती व पाणी परिक्षण प्रशिक्षण पार पडले. हे प्रशिक्षण राष्ट्रीय कृषि विस्तार व्यवस्थापन संस्था, हैद्राबाद,वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर,कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा, चंद्रपूर अंतर्गत राबविण्यात आले

सदर प्रशिक्षणाच्या उद्घाटना प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुहास पोतदार आ. नि. कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य , प्रमुख अतिथी बी.एस. सलामे जिल्हा मृदा सर्वेक्षण व मृदा चाचणी अधिकारी व सुधाकर कडू विश्वस्त महारोगी सेवा समिती वरोरा उपस्थित होते.या कार्यक्रमा दरम्यान विविध उपक्रम पार पडले राहुल खपणे (बँक व्यवस्थापक, महाराष्ट्र बँक) यांनी विविध सरकारी योजनांना बद्दल माहीती दिली. व त्याच बरोबर कृषी निगडीत उद्योग देखील करावे यासांठी त्यांनी युवकांना प्रेरित केली.विषय तज्ञ हर्षदा पोतदार, सीमा बुरान, सुशील वाघ डॉ. महाजन यांनी मातीचे महत्त्व पटवून दिले व त्याच बरोबर त्याचे व्यवस्थापन कसे करावे याबद्दल जागरूक करण्यात आले व त्याच बरोबर माती व पाणीचा नमुना चाचणी, यामध्ये सामू, क्षारता, उपलब्ध नत्र, स्फुरद व पालाश, सूक्ष्म अन्नद्रव्य तपासण्यात आले. तसेच जमिनीची आरोग्य पत्रिका तयार करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.या कार्यक्रमाचा मुख्य उद्दीष्ट म्हणजे ग्रामीण युवकांना कौशल्य प्रदान करने व माती व पाणी यांचे महत्त्व पटवून देणे होते. कार्यक्रमाचा समारोप कृषी अधिकारी वरभे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पोतदार व कृषी तंत्र निकेतन प्राचार्य हर्षदा पोतदार यांच्या हस्ते पार पडला.या प्रशिक्षणामध्ये एकूण २८ प्रशिक्षणार्थ्यांनी सहभाग नोंदवला.प्रशिक्षणाच्या यशस्वी ते करता प्रयोगशाळा परिचर बबन बिबटे आणि मीना कळसकर यांचे देखील सहकार्य लाभले

अन् दिवसभर चालतो येथे त्यांचा धिंगाणा

कुतूहलाने घेतली रागाची जागा ; माकडां पासून कवेलू व फळ झाडांची मोठी नुकसान

तळोधी(बा) । प्रतिनिधी

वन्यप्राण्यांबद्दल कुणाला प्रेम नसेल.असे व्यक्ती शोधूनही सापडणार नाही.वन्य प्राण्यांबद्दल सर्वांनाच आपुलकी अन कुतूहलच राहिलं आहे.तशी भीतीही आहेच.मात्र प्रत्येक गोष्टीला एक मर्यादा असते.मर्यादेच्या पलीकडे गेलेली कुठलीही गोष्ट डोईजड होत असते. सद्यस्थितीत सावरगाव वासियांनाही माकडांच्या नेहमीच्या उपद्रवाने हैराण करून सोडले आहे.लोकांची घरावरील कवेलू व फळ झाडांची मोठी नुकसान होत असल्याने यां माकडांना आता, कुणीतरी आवरा हो?... अशी म्हण्याची वेळ येऊन ठेपली आहे.

नागभीड तालुक्यातील सावरगाव येथील गावाच्या कडेला ज्यांची घरे आहेत.आणि घराच्या बाजूला फळांची व इतर मोठमोठी झाडे आहेत.अशा झाडांवरून– घरावर व घरांवरून –झाडांवर असा दिवसभर माकडांचा धिंगाणा सुरु असतो.यामुळे नागरिकांची मोठी नुकसान होत आहे.विशेषतः माकडांना जंगली प्राणी म्हणून गणल्या गेले आहे.मात्र बऱ्याच ठिकाणी माकडें ही गावांतील झाडांवरच बस्तान मांडले असल्याचे निदर्शनात येत आहे.त्यामुळे त्यांच्या उपद्रवाने नागरिकांचा जीव वैतागला आहे. एरवी माकडांच्या 'माकडचेष्टा' मनाला आंनद देणाऱ्या असतात.मात्र एखाद्या गोष्टीने मर्यादा ओलांडली की नकोशी होऊन जाते.अलीकडे माकडांबद्दल ही असेच झाले आहे.सावरगाव येथील अनेकांच्या घराशेजारी पळसबाग आहेत. तिथे फळ व भाजीपाल्यांची झाडे आहेत.यावर ही माकडे दररोज ताव मारीत असतात.आणि कवेलुं,टीनांच्या घरांवर उड्या मारतात. त्यामुळे नागरिकांची मोठी आर्थिक नुकसान होत असते.नाईलाजाने घराची नुकसान होते म्हणून अनेकांनी मोठी–मोठी फळं झाडे तोडून टाकली असल्याचे चित्र आहे.पण यांना रोखणार तरी कोण? यांना हाकलण्याचा प्रयत्न केला की,ही माकडें एवढी निडर झाली आहेत की ती मनुष्यांवरच चवताळतात. त्यामुळे त्यांच्या वाटीस कुणी जात नाही.आणि दिवसभर त्यांचा मनमानी कारभार सुरु असतो.आता उन्हाळा सुरु झाल्याने पाण्यासाठी त्यांचा धिंगाणा सुरु होणार आहे.अशा या त्यांच्या उपद्रवाने नागरिक कंटाळून गेले असून त्यांच्याबद्दलच्या कुतुहलाने आता रागाची जागा घेतली आहे.



> “ गावाच्या कडेला शेतालगत माझे कवेलुचे घर आहे.मोकड्या जागेत खिरणी, पेरू, डाळींब, जांभुळ,चिंच काशीबोर, करवंद आदीं फळांची मोठी झाडे आहेत. दिवसभर येथे वानरांचे कळप असतात.त्यामुळे कवेलू,फळं, भाजीपाल्याची मोठी नुकसान झाली आहे.यावर काहीच उपाय नाही काय?....
>
> **तुलोपचंद उद्धव गेडाम**
> **पत्रकार,सावरगाव ता.नागभीड.**

कीडझी चिमूरचे भावी लहानगे वैज्ञानिक स्पेस ऑन व्हील्स कार्यक्रमात सहभागी

चिमूर । प्रतिनिधी

अवकाशाशी संबंधित विविध शैक्षणिक आणि मनोरंजक बाबी अनुभवण्याची संधी कीडझी कॉन्व्हेट चिमूरचे भावी लहानगे वैज्ञानिक मुलांना मिळावी या उद्धेशाने लहानग्या वयात विद्यार्थ्यांना बाह्य अवकाशातील विशिष्टतेची ओळख करून देणे, त्यांचे ज्ञान वाढवणे आणि त्यांना अविस्मरणीय अनुभव देण्यासाठी आपल्या देशातील भावी वैज्ञानिक यांना विज्ञान दिवसाच्या निमित्ताने स्थानिक ग्रामगीता महाविद्यालयात ,विज्ञान भारती आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विज्ञान प्रदर्शनी स्पेस ऑन विल्स अंतराळाची महायात्रा हा उपक्रमात कीडझी कॉन्व्हेट चिमुर येथील जुनियर आणि सिनीअर केजीच्या विद्यार्थी सहभागी झालेत.

या वैज्ञानिक उपक्रमाद्वारे, विद्यार्थी अंतराळातील विलक्षण जगाशी गुंतले, वैज्ञानिक दृष्टी आणि त्यांची कुतुहलता तसेच तंत्रज्ञान व ग्रामीण समुदायांमधील दरी कमी करण्याच्या महत्त्वावरही या कार्यक्रमाने भर दिला. एकूणच, स्पेस ऑन व्हील्स कार्यक्रमाने सहभागी विद्यार्थ्यांवर कायमची छाप पडली, जिज्ञासा वाढवली आणि त्यांना कॉसमॉसचे चमत्कार शोधण्यासाठी प्रेरित केले. या कार्यासाठी कीडझी चिमूरच्या समन्वयक प्रियंका चांदेकर , तेजस मिसार , वर्गशिक्षिका संस्कृती बोकारे , अर्चना धापटे, आणि भाग्यश्री भोपे यांनी परिश्रम घेतले.

हिंगणीच्या पाणीपातळीत घट,९ गावांना झळा:तहसीलदारांनी केली पाहणी

वैराग–बार्शी तालुक्याला दुष्काळी तालुका म्हणून घोषित करण्यात आले आहे. फेब्रुवारी महिन्यातच दुष्काळाची तीव्रता वाढू लागली आहे. मृतसाठ्यात गेलेले हिंगणी मध्यम प्रकल्पाची पाणीपातळी झपाटल्याने कमी होत असल्याने परिसरातील ९ गावांना टंचाईच्या झळा बसत आहेत. दरम्यान तहसीलदार एफ. आर. शेख यांनी हिंगणी मध्यम प्रकल्पाला भेट देऊन पाहणी केली.

गेल्यावर्षी पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्यामुळे जानेवारी महिन्यातच हिंगणी प्रकल्पाने मृत पाण्यासाठ्याची पातळी गाठली. मृत पाणी साठ्यातील मानव आणि जनावरांच्या पिण्याकरिता आरक्षित ठेवण्यात आले आहे. मात्र तरी देखील काही जण बेकायदेशीररित्या पाणी उपसा करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे त्यांच्या विरोधात सरळ गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. .हिंगणी मध्यम प्रकल्पावरून प्रत्यक्षरीत्या वैराग, उपळे आणि गौळगाव अशा तीन गावांना नियमित पाणीपुरवठा करण्यात येत आहे आणि आपत्कालीन परिस्थितीमध्ये सहा गावांना पाणीपुरवठा केला जातो.सध्या आपत्कालीन परिस्थिती सुरू झाल्यामुळे या धरणातून नांदणी जामगाव, घाणेगाव, हिंगणी, मळेगाव आणि पिंपरी या गावांना पाणीपुरवठा केला जात आहे. दिवसेंदिवस उन्हाची तीव्रता वाढू लागल्यामुळे पाणी पातळीत कमालीची घट होत आहे. हिंगणी धरणातील आरक्षित पाणी कसे पुरवता येईल आणि पावसाळ्यापर्यंत कसे टिकवता येईल, या नियोजनाकरिता तहसीलदार शेख, पोलीस निरीक्षक निवृत्ती मोरे, अप्पर तहसीलदार वृषाली केसकर यांनी प्रकल्पाची पाहणी केली.

४४८२ चौरस मीटर जागेतील महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे भूमिपूजन

पर्यावरणाच्या विद्यापीठाचे ज्ञानकेंद्र ठरणार 'ताडोबा भवन' वनमंत्री ना.श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला विश्वास

चंद्रपूर । प्रतिनिधी

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प हा केवळ राज्य आणि देशातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरील सर्वोत्तम व्याघ्र प्रकल्प करण्यासाठी आम्ही कटिबध्द आहोत. आज येथे देश विदेशातील विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्ती पर्यटनासाठी येतात. भविष्यात विविध देशाचे पंतप्रधान ताडोबा पर्यटनासाठी येतील, असा विश्वास मला आहे. अशावेळी ताडोबाच्या वैभवाची प्रचिती देणारे एक सुरेख भवन याठिकाणी असायला हवे, असा विचार मनात आला. त्यामुळेच ४४८२ चौ. मीटर मध्ये एक उत्कृष्ट ताडोबा भवन उभारण्याचा संकल्प केला आहे. ही केवळ एक साधी इमारत नसेल तर ताडोबा भवन हे पर्यावरणाच्या विद्यापीठाचे चालते-बोलते ज्ञानकेंद्र ठरणार आहे, असा विश्वास राज्याचे वनमंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

चंद्रपूर येथे ताडोबा भवनाच्या नवीन इमारत बांधकामाचे भुमिपूजन करताना वनमंत्री मुनगंटीवार बोलत होते. यावेळी वन विभागाचे प्रधान सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) तथा वनबल प्रमुख शैलेश टेंभुर्णीकर, प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक) शोमिता विश्वास, महिम गुप्ता, ताडोबाचे क्षेत्रीय संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर, उपवनरंक्षक कुशाग्र पाठक, जितेश मल्होत्रा, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता अरुण गाडेगोणे, कार्यकारी अभियंता मुकेश टांगले, विभागीय वनअधिकारी प्रशांत खाडे आदी उपस्थित होते.

सुरवातीला इमारतीच्या बांधकामाचे भुमिपूजन झाले असे घोषित करून वनमंत्री मुनगंटीवार म्हणाले, ताडोबा भवन ही निर्जीव इमारत नसेल. तर पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने ते एक चालतं-बोलतं विद्यापीठच राहील. देशाचे रक्षण करणा-या जवानांना आपण सॅल्यूट करतो, तसेच पर्यावरणाच्या संरक्षणासाठी कार्यरत असणा-या वन अधिकारी व कर्मचा-यांना आज सॅल्यूट करण्याची गरज आहे. देशाची सेवा सर्वतोपरी आहे, तशीच वसुंधरेची रक्षा रक्षा होणे गरजेचे आहे. महाराष्ट्राचा वनविभाग हा देशात सर्वोत्कृष्टच असला पाहिजे. जगायचा आनंद पैशाने विकत घेता येत नाही, तो पर्यावरणातूनच मिळू शकतो. त्यामुळे ताडोबा भवन हे पर्यावरणाचा आनंद देणारे केंद्र राहील.पुढे ते म्हणाले, ताडोबा भवन हे इको - फ्रेंडली असावे, या इमारतीमध्ये विजेचे बील येता कामा नये, त्यासाठी संपूर्ण इमारत सोलर पॅनलवर करावी. या इमारतीच्या बांधकामासाठी १८ कोटी ८ लक्ष रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे, मात्र इतर अत्याधुनिक सोयीसुविधा करण्यासाठी अतिरिक्त १४ कोटी रुपये त्वरीत देण्यात येतील. वनविभागाच्या प्रस्तावांना गती देण्याच्या सुचना त्यांनी यावेळी अधिका-यांना दिल्या.

वन विभागात पायाभूत सुविधा उत्तम

वन विभागाच्या इमारती, विश्रामगृह अतिशय उत्तम करण्यात येत आहे. सोबतच संपूर्ण राज्यातील वन कर्मचा-यांच्या निवासी वसाहतीसुध्दा कॅम्पा मधून उत्तम करण्याच्या सुचना अधिका-यांना देण्यात आल्या आहेत.

असे राहील ताडोबा भवन

> चंद्रपूर येथील मुल रस्त्यावर असलेल्या क्षेत्र संचालक, ताडोबा - अंधारी व्याघ्र प्रकल्प कार्यालयाच्या खुल्या जागेत १८ कोटी ८ लक्ष खर्च करून नवीन ताडोबा भवन बांधण्यात येणार आहे. यात तळमजल्यावर (१३६०.४७ चौ. मी.) १०० आसन क्षमतेचे ऑडीटोरीयम, पहिल्या माळ्यावर (१५५८.५८ चौ. मी.) उपवनरंक्षक (बफर) आणि उपवनसंरक्षक (कोअर) यांचे कार्यालय तर दुस-या माळ्यावर (१५६३.१४ चौ. मी.) क्षेत्रीय संचालक यांचे कार्यालय राहणार आहे. याशिवाय संकीर्ण बांधकामामध्ये पेव्हींग ब्लॉक आणि रेन वॉटर हार्वेस्टिंग या कामांचा समावेश आहे.

मुख्यमंत्र्यांची घोषणा फसवी आमदार सुधाकर अडबाले

विनाअट जुनी पेन्शन योजना लागू करा

चंद्रपूर । प्रतिनिधी

राज्यातील १ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर नियुक्त कर्मचारी - अधिकाऱ्यांसाठी सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्याची विधानसभेत मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली. ही घोषणा शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांवर अन्याय करणारी असून निवडणूकीच्या तोंडावर केलेली ही घोषणा फसवी असल्याची टीका आमदार सुधाकर अडबाले यांनी केली.

शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी गेल्या अनेक वर्षांपासून जुनी पेंशन योजना लागू करण्याच्या मागणीला घेऊन सरकारशी लढा देत आहेत. या लढ्यामुळे राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली व जुनी निवृत्तीवेतन योजना यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत वित्त विभागाचा १४ मार्च २०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. समितीचा अहवाल येण्यास आठ महिन्यांचा कालावधी लागला. समितीने सरकारला सादर केलेला अहवाल सभागृहात सादर करून जुनी पेंशन योजना लागू करावी, अशी मागणी सातत्याने आमदार सुधाकर अडबाले सरकारकडे करीत होते.अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२४ मधील शेवटच्या दिवशी राज्यातील १ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर नियुक्त कर्मचारी - अधिकाऱ्यांसाठी सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्याची विधानसभेत मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली. या योजनेत नियत वयोमानानुसार (३० वर्ष सेवा पूर्ण झाल्यास) निवृत्त होणारे कर्मचारी यांनी जर प्रस्तावित योजनेचा विकल्प दिल्यास त्यांना त्यांच्या शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के इतके निवृत्तीवेतन व त्यावरील महागाई वाढ तसेच निवृत्तीवेतनाच्या ६० टक्के कुटूंब निवृत्तीवेतन व त्यावरील महागाई वाढ मिळेल. जुन्या पेंशन योजनेत पेंशन मिळण्यासाठी कोणतीही कपात होत नाही. मात्र, या योजनेत एनपीएस प्रमाणे १० टक्के अंशदानाची कपात नापरतावा सूरूच राहणार आहे. जुन्या पेंशन योजनेत नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना शेवटच्या पगाराच्या ५० टक्के पेंशन मिळण्यासाठी केवळ १० वर्ष सेवा पुरेशी होती. या योजनेत ३० वर्ष सेवेची अट असणार आहे. जुन्या पेंशन योजनेत स्वेच्छा सेवानिवृत्तीसाठी २० वर्ष सेवा पुरेशी होती. तर या योजनेत तसा कोणताच नियम नाही. १९८२ च्या जुन्या पेन्शन योजनेंतर्गत येणाऱ्या कर्मचाऱ्यांना वेतन आयोगाच्या शिफारशी लागू होतात, दर १० वर्षात नवीन वेतन आयोगानुसार पेंशन पुनर्रचना करण्यात येते, ज्यात पेन्शन बेसिक जवळपास दुप्पट वाढत असते. तर या योजनेत नवीन वेतन आयोगानुसार पेंशन पुनर्रचना होण्याचा काही संबंध नसणार आहे. ज्या पेंशन बेसिकवर कर्मचारी निवृत्त झाला असेल, तो आजीवन त्याच बेसिकवर पेंशन घेईल. यामुळे जुन्या पेंशन धारकांच्या पेंशनच्या तुलनेत चार-पाच पट मागे राहील. जुन्या पेंशन योजनेत दर ६ महिन्याला पेंशनवर महागाई ५ ते ६ टक्के भत्ता वाढत असतो तर या योजनेत डीए वाढ नसणार आहे.सोबतच जुन्या पेंशन योजनेत अंशराशीकरण पेंशन विक्री करता येते. जीपीएफची रक्कम व्याजासह मिळत होती. या नवीन योजनेत अशी कुठलीच तरतूद करण्यात आलेली नाही. तसेच १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व त्यानंतर टप्याटप्याने १०० टक्के अनुदानावर आलेल्या राज्यभरातील शाळांवर कार्यरत शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा सुद्धा या योजनेत समावेश करण्यात आलेला नाही. समान काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना असमान पेंशन देण्याचे धोरण सरकार आखत असून कर्मचाऱ्यांत तेढ निर्माण करण्याचे काम सरकार करीत आहेत. यामुळे राज्यातील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांत सरकारप्रती तीव्र असंतोष पसरला आहे.जुन्या पेन्शन योजनेची मागणी होत असताना सुधारीत पेंशन योजनेची मुख्यमंत्र्यांनी केलेली घोषणा फसवी असून कर्मचाऱ्यांचे भविष्य अंधारात टाकणारी आहे. निवडणुकीच्या तोंडावर सरकारने दिलेले हे गाजर असून शिक्षक - राज्य कर्मचारी यास बळी पडणार नाहीत. नकारात्मक असणारे सरकार आज शिक्षक- राज्य कर्मचाऱ्यांच्या लढ्यामुळे सकारात्मक होताना दिसत आहे. यामुळे सरकारने विनाअट १९८२-८४ ची जुनी पेंशन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी आपला हा लढा असा सुरू राहील, अशी माहिती आमदार सुधाकर अडबाले यांनी दिली.

ग्रामगीता महाविद्यालयाचे प्रा.डॉ.अमीर धमानी सेवानिवृत्त

चिमूर । प्रतिनिधी

चिमूर येथील ग्रामगीता महाविद्यालयाची २००९ मध्ये स्थापना झाल्यानंतर काही वर्षानंतरच हे महाविद्यालय शासकीय अनुदानास पात्र ठरले. आणि वनविकास प्रशिक्षण मंडळ गडचिरोली द्वारा संचलित ग्रामगीता महाविद्यालयात संस्थेने नागपूर व गडचिरोली विद्यापीठात नावलौकिक असलेले तसेच दोन्ही विद्यापीठाच्या वेगवेगळ्या शैक्षणिक पदांवर कार्य करणाऱ्या डॉ. अमीर धमानी यांची प्राचार्य पदी नेमणूक केली. आपल्या ३६ वर्षाच्या प्रदीर्घ अध्यापन व प्रशासकीय सेवा कालखंडानंतर ते दिनांक २९ फेब्रुवारी रोजी सेवानिवृत्त झाले.

संस्थेचे पदाधिकारी व महाविद्यालयाचे स्टाफ च्या वतीने त्यांचा सेवानिवृत्ती सोहळा आयोजित करण्यात आला. या सोहळ्याप्रसंगी प्राचार्य डॉ. अमीर धमानी व त्यांच्या सहचारिणी पिंकीताई धमानी यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. एम. एम. गाडेगोने होते. याप्रसंगी मंचावर नागपूरचे डॉ. बारसागडे, डॉ. रेमंड अँड्रू, डॉ. जगनाडे, डॉ. वाडेकर, डॉ. बत्रा, डॉ. बाकरे उपस्थित राहून त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आणि प्राचार्य डॉ. अमीर धमानी यांच्या शैक्षणिक कार्याचा गुणगौरव करून शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला.प्राचार्य डॉ. धमानी यांनी, त्यांच्या कार्यकाळात महाविद्यालयाची शैक्षणिक आणि भौतिक प्रगती करून ग्रामगीता महाविद्यालयाला एक नावलौकिक प्राप्त करून दिला. त्यांच्या कार्यकाळात या महाविद्यालयातील विद्यार्थी अनेक प्रकारच्या राज्यस्तरीय व देशपातळीवरच्या स्पर्धेमध्ये सहभागी झालेत. त्यांच्या कार्यकिर्दीतच महाविद्यालयाचे प्रथम नॅक मूल्यांकन होऊन 'बी प्लस' दर्जा प्राप्त झाला. महाविद्यालयातील शैक्षणिक व भौतिक सोयी सुविधेमध्ये वाढ झाली. त्यामुळे एकूणच या महाविद्यालयाची प्रगती सतत होत राहून विद्यार्थी संख्येत वाढ होत आहे . त्यांच्या अध्यापन, प्रशासकीय व संशोधन कार्यासाठी गोंडवाना विद्यापीठाने २०२२ मध्ये उत्कृष्ट प्राचार्य म्हणून त्यांचा सन्मान केला. चिमुर क्षेत्रातील शैक्षणिक प्रगती करण्यासाठी महाविद्यालयात विज्ञान शाखेमध्ये चार विषयात पदव्युत्तर विभाग त्यांनी आपल्या प्रयत्नातून सुरू केलेत.

या कार्यक्रमात महाविद्यालयाच्या स्टॉफ मधील प्रा. संदिप मेश्राम, प्रा. हुमेश्वर आनंदे, डॉ. बिजनकुमार शील, डॉ. युवराज बोधे, संजय दुधनकर,निखिल भालेराव यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना प्राचार्य डॉ. धमानी यांच्या कार्य कुशलतेचा गुण गौरव करत प्राचार्य पदी असतांना त्यांच्या व कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेल्या जिव्हाळ्याच्या नात्यामुळे आपल्या प्रिय प्राचार्याला निरोप देतांना संपूर्ण महाविद्यालयाचे प्राध्यापक व कर्मचारी वृंद भावुक झाले होते.या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. अश्विन चंदेल, डॉ. ठावरी, डॉ. जी.डी. देशमुख, प्रा. कार्तिक पाटील यांच्यासह नेवजाबाई हितकारिणी, भिसी महाविद्यालयचे प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

---

२१ कारखान्यांचे गाळप १० मार्च पर्यंत संपणार सोलापूर जिल्ह्यात ३ कारखान्यांचे गाळप संपले

सोलापूर-यावर्षीचा ऊस गाळप हंगाम सध्या संपण्याच्या मार्गावर आहे. सद्यस्थितीत जिल्ह्यातील ३ साखर कारखान्यांतील गाळप हंगाम संपला आहे. सिद्धेश्वर सहकारी, सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील, विठ्ठलराव शिंदे सहकारी आणि पांडूरंग सहकारी हे चार कारखाने वगळून इतर सर्व कारखान्यांचा पट्टा १० मार्चपूर्वीच पडेल, असा अंदाज साखर आयुक्तालयाकडून बांधण्यात आला आहे. एकिकडे कारखाने बंद होऊ लागलेत. दुसरीकडे मात्र तब्बल २६५.८२ कोटी २३० रुपयांची शेतकऱ्यांची ऊसबिले साखर कारखान्यांनी थकवली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.सोलापूर जिल्ह्यातील १३ सहकारी आणि २३ खासगी अशा एकूण ३६ साखर कारखान्यांमधून यावर्षीचा गाळप हंगाम चालू आहे. दुष्काळसदृश्य स्थितीमुळे यावर्षी गाळपासाठी ऊस कमी होता. त्यामुळे ऊसाला सर्वाधिक दर देण्यासाठी कारखान्यांमध्ये स्पर्धा लागल्याचे चित्र होते. मागील वर्षी मुबलक ऊसामुळे एप्रिलच्या शेवटपर्यंत गाळप हंगाम चालला. जिल्ह्यात २९ फेब्रुवारीपर्यंत १४५.२८ लाख, ३६८ मेट्रिक टन ऊसाचे गाळप झाले. त्यातून १३४ लाख, ८ हजार, ९० क्विंटल साखरेचे उत्पादन झाले. सद्यस्थितीत जिल्ह्यातील शंकर सहकारी साखर कारखाना, विठ्ठल रिफाइन्ड आणि आष्टी शुगर या ३ कारखान्यांचा गाळप हंगाम संपला आहे. १५ फेब्रुवारीपर्यंत गाळप झालेल्या ऊसाची एकूण बिले २८०७.१५ कोटी रुपये इतकी आहेत. त्यापैकी कारखान्यांनी २५४१.३३ कोटी रुपयांची बिले अदा केली. उर्वरित २६५ कोटी ८२ लाख २३० रुपयांची बिले थकली आहेत.

नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यात चंद्रपूर जिल्हा आदर्श ठरावा-मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार

श्री माता कन्यका सेवा संस्थेच्या वतीने जागतिक श्रवणदिनानिमित्त श्रवणयंत्र वाटप

चंद्रपूर । प्रतिनिधी

नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यात, त्यांच्या आरोग्याची योग्य निगा राखण्यात, वेळच्या वेळी उपचार देण्यात चंद्रपूर जिल्हा राज्यात आदर्श ठरावा. त्यासाठी संपूर्ण जिल्ह्यात आरोग्य शिबिरे घ्या. कोणताही रुग्ण पैशाअभावी उपचारापासून वंचित राहायला नको. देशगौरव पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या 'मन की बात'मध्ये उल्लेख व्हावा, असे काम आपल्या हातून झाले पाहिजे, अशी अपेक्षा राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी व्यक्त केली.

श्री माता कन्यका सेवा संस्थेच्या वतीने जागतिक श्रवणदिनानिमित्त श्रवणयंत्र वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते श्रवणयंत्रांचे वाटप करण्यात आले. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. चिंचोळे, संस्थेचे सचिव राजेश्वर सुरावार, शैलेंद्रसिंह बैस ,वैद्यकीय अधीक्षक डॉ. चांदेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ. इशिता मांडविया, डॉ. श्वेता लोहिया, श्वेता आईचवार, विवेक माणिक, डॉ. राहुल भोंगळे, डॉ. सचिन बिलवणे यांचा सत्कार करण्यात आला. तर सागर खडसे, सुरज पेदूलवार, प्रज्वलंत कडू यांची कार्यक्रमाला उपस्थिती होती. यावेळी डॉक्टर व रुग्णांनी आपले अनुभव सांगितले. 'जिल्हा शल्य चिकित्सकांनी मला निधीची गरज असल्याचे सांगितले. मी डीपीडीसीतून निधी उपलब्ध करून दिला आणि आज हा कार्यक्रम होत आहे. त्यामुळे मला आज खूप आनंद होत आहे,' अशी भावना ना. मुनगंटीवार यांनी व्यक्त केली. ते म्हणाले, 'जगातील सर्वांत सुरक्षित जागा आईची मांडी आहे. जगातील सर्वांत मोठे सिंहासन देखील आईची मांडी आहे. जगातील सर्वांत मोठा सागर आईच्या हृदयातील प्रेमाचा सागर आहे. अशावेळी तिला जेव्हा कळतं की बाळाला ऐकू येत नाही तेव्हा तिच्या मनाची अवस्था तिलाच ठावूक असते. त्यामुळे या कार्यक्रमात आपण मुलांना मदत करीत नसून मातेचा गौरव करतोय.'

रुग्णांना वेळीच उपचार मिळावा

> चंद्रपूरमधील प्रत्येक गोष्ट उत्तम करण्याचा माझा प्रयत्न आहे. म्हणूनच मेडिकल कॉलेज, शंभर खाटांचे हॉस्पिटल, कॅन्सर हॉस्पिटल आपण चंद्रपूरमध्ये करतोय. प्राथमिक आरोग्य केंद्र अद्ययावत करतोय. कारण एखाद्याला गंभीर आजाराने ग्रासले तर त्याला वेळीच उपचार मिळायला हवा, असे ना. मुनगंटीवार म्हणाले. अखेरच्या श्वासापर्यंत लोकांची सेवा करण्यासाठी परमेश्वराने आशीर्वाद द्यावा, अशी प्रार्थना करतानाच गरिबांच्या पाठीशी उभे राहण्याचा संकल्प आपण करीत असल्याचे ना. मुनगंटीवार म्हणाले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .